मा. मुख्यमंत्री महोदयांच्या “वर्षा” या शासकीय निवासस्थानी मान्यवर अतिथींसाठी खानपान सेवा पुरवठादाराची नियुक्ती करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक उपुनि २०१७/प्र.क्र. २९/२०१७/का-२१-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई - ४०० ०३२.

दिनांक - ३० डिसेंबर २०१७.

शासन निर्णय :-

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या “वर्षा” या शासकीय निवासस्थानी मान्यवर अतिथींसाठी खानपान सेवा पुरवठादाराची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा क्र. २०१७_GADM_२५६५११_१ अन्वये ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. ई निविदेतील, SECTION (II) - BID OPENING AND EVALUATION परि. ४ - EVALUATION AND COMPARISON OF BID मधील तरतुदीनुसार, प्राप्त् ई-निविदांचे तांत्रिक मूल्यमापन केले असता, छत्रधारी कॅटरर्स, मुंबई यांची ई-निविदा पात्र ठरली आहे. त्यांनी सादर केलेल्या अन्नपदार्थांच्या दरसूचीची एकूण किंमत रु. १५७७/- एवढी आहे.

२. त्यामुळे, या शासन निर्णयान्वये, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या “वर्षा” या शासकीय निवासस्थानी मान्यवर अतिथींसाठी खानपान सेवा पुरविण्यासाठी छत्रधारी कॅटरर्स, मुंबई यांची रु. १५७७/- ची ई-निविदा स्वीकारण्यात येत आहे. त्यांची दि. ०१ जानेवारी २०१८ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या “वर्षा” या शासकीय निवासस्थानी, खाली नमूद केलेल्या दराने खानपान सेवा पुरविण्यासाठी नियुक्ती करण्यात येत आहे.

दरपत्रक

Sr.No.	Food Items	Rate exclusive of GST (Rs.)
1	Tea (125 ml)	14.00
2	Coffee (125 ml)	12.00
3	High Tea (Pestry / Sweet, Kaju-Badam, Sandwich, Wafer, Batatavada / Upama / Poha / Cutlet)	115.00
4	Various cold drinks (250/300 ml)	15.00
5	Dahimisal (75 gm)	20.00
6	Idli (2 no)	26.00
7	Vadasambar (2 no)	26.00
8	Potato Vada (2 no)	25.00
9	Dahivada (2 no)	20.00
10	Sabudana Vada (2 no)/ Sabudana Khichadi	20.00
11	Kachori (75 gm)	18.00
12	Veg Cutlet (2 no)	20.00
13	Upama / Shira (75 gm)	26.00
14	Sada Dosa	18.00
15	Masala Dosa (75 gm)	24.00
16	Uttappa (75 gm)	18.00
17	Veg Sandwich	15.00
18	Cheese Sandwich	18.00
19	Chicken Sandwich	22.00
20	Veg. Grilled Sandwich	20.00
21	Cheese Grilled Sandwich	22.00
22	Chicken Grilled Sandwich	22.00
23	Wafers (75 gm)	15.00

24	Bhaji / Mix bhaji / Pakoda (75 gm)	18.00
25	Biscuits	20.00
26	Dry Fruits/Cashew nut (75 gm)	30.00
27	Sweet (Gulabjamun / Rasgulla / Barfi) (2 no.)	18.00
28	Veg. Soup	18.00
29	Chicken Soup	20.00
30	PavBhaji (2 Pav)	25.00
31	Alu Palak	22.00
32	Paneer Matar	25.00
33	Methi Besan	20.00
34	Veg. Biryani	30.00
35	Non Veg. Biryani	40.00
36	Veg. Fried Rice	30.00
37	Non Veg. Fried Rice	35.00
38	Veg. Thali (full)	85.00
39	Non Veg. Thali (full)	90.00
40	Veg. Exe. Buffet Lunch (Soup, Starters, Main Course, Roti, Dal, Rice, Salad, Sweets, Fruits)	210.00
41	Non Veg. Exe. Buffet Lunch (Soup, Starters, Main Course, Roti Dal, Rice, Salad, Sweets, Fruits)	250.00
42	Bisleri – 500 ml.	10.00
43	Fruit Dish	15.00
44	Fruit Salad	15.00
	Total Rs.	**1577.00**

३. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या “वर्षा” या शासकीय निवासस्थानी मान्यवर अतिथींसाठी खानपान सेवा पुरविण्यासाठी शासन व छत्रधारी कॅटरर्स, मुंबई यांचेमध्ये दि.०१ जानेवारी २०१८ ते ३१ डिसेंबर २०१९ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी करार करण्यात येत आहे. करारनाम्यातील अटी व शर्ती छत्रधारी कॅटरर्स, मुंबई यांना बंधनकारक असून त्याचे उल्लंघन झाल्यास सदर कंत्राट कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

४. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानाचे नियंत्रक निवासव्यवस्था हे कॅटरींग सेवेशी संबंधीत सर्व प्रकरणे हाताळण्यासंदर्भात सक्षम प्राधिकारी राहतील व विशेष महत्वाच्या प्रसंगी आवश्यकतेनुसार, वर्षा निवासस्थानी बाहेरून अथवा अन्य पुरवठादाराकडून खाद्यपदार्थ मागविणे अथवा खाद्यपदार्थ पुरविण्याच्या सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. या पदार्थांचे दर/दर्जा/प्रमाण हे सक्षम प्राधिकारी निश्चित करतील.

५. मा. मुख्यमंत्री महोदयांचे शासकीय निवासस्थान वर्षा येथे चालविण्यात येणाऱ्या उपाहारगृहाच्या जागेच्या भाडयाची आकारणी, वीज व पाणी बिलाची आकारणी शासन निश्चित करेल त्याप्रमाणे असेल.

६. मा. मुख्यमंत्री महोदयांचे शासकीय निवासस्थान वर्षा येथे उपाहारगृह चालविण्यासाठी छत्रधारी कॅटरर्स, मुंबई यांना वापरावयास देण्यात येणाऱ्या खोल्यांचे भाडे, वीज व पाणी यांचे भाडे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (इलाखा शहर) यांचेकडे शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार, छत्रधारी कॅटरर्स, मुंबई यांनी अदा करावे.

७. वरील खाद्यपदार्थांव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार इतर खाद्यपदार्थांची मागणी केल्यास कंत्राटदारास ते पुरवावे लागतील व अशा खाद्यपदार्थांचे दर मान्य करण्याचा अधिकार सामान्य प्रशासन विभागास राहील व ते कंत्राटदारास बंधनकारक राहील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०११५४८००१५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Aarti Pramod Pednekar

Digitally signed by Aarti Pramod Pednekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ba1d84d11252ff4075a396de271258bdafdfad3625788efeecaaeb58694f4c8, serialNumber=6fbdfa79526060fea8c4197396c8fa496bcc1a3e52fb21ec7e45faea709ccea6, cn=Aarti Pramod Pednekar
Date: 2018.01.01 15:57:35 +05'30'

(आ. प्र. पेडणेकर)
कार्यासन अधिकारी

प्रति,

छत्रधारी कॅटरर्स, बी-६०१, साईनाथ अपार्टमेंट, नवघर रोड, टाटा कॉलनीजवळ, मुलुंड (पूर्व), मुंबई.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. कार्यासन २१-रोख, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
५. उपसचिव (आस्थापना), मुख्यमंत्री सचिवालय यांना विनंती करण्यात येते कि, त्यांनी उपाहारगृहाच्या अनुषंगाने आवश्यक त्या नोंदवहया ठेवण्याबाबत तसेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत उपाहारगृहाच्या खर्चावर योग्य ते नियंत्रण ठेवण्याबाबत निवासी स्वीय सहायकांना सूचना द्यावी.
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (इलाखा शहर), विकास विभाग इमरत, तिसरा मजला, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई यांना कळविण्यात येते कि, मा. मुख्यमंत्री महोदयांचे शासकीय निवासस्थान वर्षा येथे चालविण्यात येणाऱ्या उपाहारगृहाच्या जागेच्या भाडयाची आकारणी, वीज व पाणी बिलाची निश्चित वेळेत वसुली करण्यात यावी.
७. निवडनस्ती,